# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


NO.: MERC/ADM/RTI/049/2024/ **0424** Dt. 19.07.2024

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत,
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८,
रूम नंबर ४, उल्हासनगर-१,
जि.- ठाणे, पिनकोड -

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि.१०.०७.२०२४ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज, आयोगाच्या कार्यालयास दि.११.०७.२०२४ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील मधील माहिती खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | आपल्या राज्यामध्ये ग्राहक तक्रार न्यायमंच प्रत्येक झोन अधिन विज ग्राहक न्यायासाठी आहेत त्यामध्ये १) अध्यक्ष, २) सचिव तथ सदस्य व कार्यकारी अभियंता, ३) स्वतंत्र महिला असे असून ३ पैकी कोणताही एक व्यक्ती सुट्टीवर गेला किंवा येत नाही तर २ व्यक्ती ग्राहक न्याय व्यवस्थापन चालवू शकत नाही असा जिआर किंवा विज नियामक आयोगाची प्रत स्वाक्षरी मिळावी. | संबंधीत माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही. तथापि, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० च्या विनियम ५.५ आणि ५.६ मधील तरतुदीनुसार मंचाची गणपूर्ती राहील. सदर विनियमाची प्रत आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.** |
| २ | आपल्या राज्यामध्ये विज ग्राहकासाठी न्याय जलद व योग्य मिळावा म्हणून तक्रारन्याय मंचाची सुनावणी कार्यालयीन दिवशी चालू ठेऊ नये किंवा एवढीच केस न्यायसुनावणी प्रत्येक ५ दिवस हप्ता किंवा महिना ठेवावी त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी. | संबंधीत माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही. तथापि, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० च्या विनियम ५.४ मधील तरतुदीनुसार, मंचाला शक्य होईल तितक्या त्वरेने चौकशी पूर्ण करून विनियम ५.२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कमाल कालावधीत उचित आदेश पारित करणे शक्य व्हावे म्हणून, मंच एका महिन्यात आवश्यक तितक्या बैठका घेईल. सदर विनियमाची प्रत आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.** |

| | | |
|---|---|---|
| ३ | आपल्या राज्यामध्ये ग्राहक तक्रार न्यायमंचामध्ये कोणते कोणते पद आहे व त्याचे कार्य काय आहे नियमबाध्य व त्यांना कोणत कोणते अधिकार प्रदान करण्यात आल्याची सविस्तर स्वाक्षरी प्रत मिळावी. | मंचाची रचना आणि त्याची कार्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० मध्ये देण्यात आली आहेत. सदर विनियमाची प्रत आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.** |
| ४ | आपल्या पूर्ण राज्यामध्ये ग्राहक न्यायमंचाच्या न्यायालयाच्या न्यायाधीशाला महिला यांना मानधन विज नियामक आयोग देतो की विज कंपनी याची स्वाक्षरी प्रत माहिती मिळावी. | |
| ५ | आपल्या पूर्ण राज्यामध्ये ग्राहक न्यायमंचाचा आदेश पासून सर्व कार्य मराठी भाषेमध्ये शासन नियमबाध्य आहे तर आपल्या कोणत्या कोणत्या ग्राहक तक्रार न्यायमंचामध्ये मराठी भाषा कार्य पूर्ण काय होत नाही व कोणाच्या आदेशाने व याबाबत विज नियामक आयोग काय कारवाई करत आहे या दोन्ही बाबींची सविस्तर माहिती स्वाक्षरी प्रत मिळावी. | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० च्या विनियम २७ नुसार मंचाकडे गाऱ्हाणे मांडण्याची आणि मंचाच्या कामकाजाची भाषा इंग्रजी किंवा मराठी राहील. सदर विनियमाची प्रत आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.** |

** As per the Hon'ble CIC decision No. CIC/YA/A/2014/000379/SB Dated 19.09.2016 in the matter of Shri. K. Lall Vs M. K. Bagri, Assistant Registrar of Companies and CPIO, Appeal No. CIC/AT/A/2007/00112, dated 12.04.2007, since the same is available in public domain, the PIO is not obliged to provide the same to the appellant under the RTI Act

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री. अभिजीत चाटुफळे, उपसंचालक (प्रशासन व वित्त) / प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४ / ६५ / ६९ **Email:** abhijeet.chatuphale@merc.gov.in.

आपला विश्वासू,

(अरूण वाळुंज)
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव